# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.10.2025** **वारःरविवार**

---

पंतप्रधानांच्या हस्ते पीएम धनधान्य कृषी योजना आणि डाळ उत्पादनात आत्मनिर्भरता मोहिमेला प्रारंभ.
पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्जिए गोर यांची दिल्लीत भेट.
शाळा प्रवेश आणि परीक्षा शुल्क भरण्यासाठी युपीआयचा वापर करण्याचं शिक्षण मंत्रालयाचं शाळांना आवाहन
आणि
भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यातल्या पहिल्या डावात भारताकडे 378 धावांची आघाडी

**धनधान्य**

प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजना आणि डाळींमध्ये आत्मनिर्भरता मोहीम देशातील लाखो शेतकऱ्यांचं भविष्य बदलतील असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल व्यक्त केला. पीएम धनधान्य कृषी योजना आणि डाळ उत्पादनात आत्मनिर्भरता मोहिमेसह ४२ हजार कोटी रुपये खर्चाच्या कृषी योजनांचा प्रारंभ काल पंतप्रधानांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. देशात विविध ठिकाणी झालेल्या या कार्यक्रमांत शेतकरी दूरस्थ पद्धतीनंसहभागी झाले होते. या योजना आत्मनिर्भरता, ग्रामविकास आणि कृषी नवोपक्रमाच्या नवीन युगाची सुरुवात आहेत; असं पंतप्रधान म्हणाले. देशातल्या ३५ लाख हेक्टर क्षेत्रावर डाळीचं उत्पादन करणं हे या मोहिमेचं उद्दिष्ट आहे. यात तूर, उडीद, मसुर डाळीचं उत्पादन वाढवलं जाईल, याचाफायदा दोन कोटी डाळ उत्पादकांना होईल, असं त्यांनी सांगितलं. धनधान्य योजनेत पशुधनावरही लक्ष केंद्रित केल्यांचं पंतप्रधान म्हणाले.

केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनीही यावेळी उपस्थितांना संबोधित केलं. रब्बी पिकांच्या हमीभावात सरकारने वाढ केली, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजने अंतर्गत ३ लाख ९० हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरित झाला, असं चौहान यांनी सांगितलं. या योजनेचा महाराष्ट्रातला मुख्य कार्यक्रम पुण्यात कृषिमंत्रीदत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. राज्यातल्या पालघर ,रायगड, धुळे, छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या नऊ जिल्ह्यांचा योजनेत समावेश आहे.

**मोदीअमेरिका**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्जिए गोर यांची भेट घेतली. गोर यांच्या कार्यकाळात भारत-अमेरिका यांच्यातील व्यापक जागतिक धोरणात्मक भागीदारी अधिक भक्कम होईल असा विश्वास पंतप्रधानांनी समाज माध्यमांवरील संदेशात व्यक्त केला आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि गोर यांच्यादरम्यान उभय देशांतील द्विपक्षीय संबंध आणि त्याचे जागतिक महत्त्व यांवर चर्चा झाली. गोर यांना नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्याचं जयशंकर यांनी एका समाजमाध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. तत्पुर्वी, परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री आणि गौर यांच्यादरम्यान भारत- अमेरिका व्यापक जागतिक धोरणात्मक भागीदारी यांवर फलदायी चर्चा झाल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं नमूद केलं आहे. त्याशिवाय भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांच्याशीही गोर यांनी चर्चा केली.

**<u>मोदीभेट</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत अँथ्रोपिक कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डारीओ ॲमोदेई यांची भेट घेतली. प्रमुख क्षेत्रांमध्ये विकासासाठी एआयचा वापर करण्यासाठी एकत्र काम करण्यास उत्सुक असल्याचं सांगत  पंतप्रधानांनी अँथ्रोपिकच्या विस्ताराचं स्वागत केलं.

**<u>मुत्ताकताजमहाल</u>**

अफगाणिस्तानचे परराष्ट्र मंत्री मौलवी अमीर खान मुत्ताकी आज आग्रा येथील ताजमहालला भेट देणार आहेत. ते आठवडाभराच्या राजनैतिक दौऱ्यावर भारतभेटीसाठी आलेले आहेत.
दिल्लीमध्ये वाणिज्य संघटनेने आयोजित केलेल्या उद्योग आणि व्यवसाय प्रतिनिधींच्या बैठकीतही ते सहभागी होतील. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांच्याशीही मुत्ताकी यांची स्वतंत्र बैठक होण्याची शक्यता असून, त्यामध्ये सुरक्षा, दहशतवादाला विरोधी, मानवतावादी मदत तसंच अफगाण विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी व्हिसा हे विषय चर्चेला येऊ शकतात, असं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

कॅनडापरराष्टमंत्री

कॅनडाच्या हिंद प्रशांत धोरणाचा भाग म्हणून कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री अनिता आनंद आजपासून १७ ऑक्टोबरपर्यंत भारत, सिंगापूर आणि चीन दौऱ्यावर येत आहेत. भारत दौऱ्यामध्ये त्या परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांची भेट घेतील. तसंच कॅनडा आणि भारत दोन्ही देशांमध्ये गुंतवणूक, रोजगार निर्मिती आणि आर्थिक संधींना चालना देणाऱ्या कॅनडा आणि भारत देशांमधील व्यावसायिकांशी मुंबईत संवाद साधतील.

**<u>बिहारराजकीय</u>**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी रालोआ आणि महाआघाडी या दोन्हींच्या घटक पक्षांमध्ये जागावाटपासाठी व्यापक चर्चा सुरू आहे. भाजपच्या सुकाणू समितीची बैठक काल दिल्लीत राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्या निवासस्थानी झाली. या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उपस्थित होते. मित्रपक्षांतील जागावाटपाच्या व्यवस्थेवर तसंच भाजपच्या संभाव्य उमेदवारांच्या नावांविषयी बैठकीत सविस्तर चर्चा झाली. दुसरीकडे महाआघाडीतील घटकपक्षही जागावाटपासंदर्भात तोडगा काढण्याच्या

प्रयत्नात आहेत. राष्ट्रीय जनता दल पक्षाचे अध्यक्ष लालू प्रसाद यादव यांनी उमेदवारांची नावे अंतिम करण्यासाठी वरिष्ठ नेत्यांसमवेत बैठक घेतली. तर काँग्रेस पक्षाने पाटणा आणि दिल्लीमधील वरिष्ठ नेत्यांसमवेत दूरस्थ प्रणालीद्वारे बैठक घेतली.

**<u>शिक्षणमंत्रालययुपीआय</u>**

शाळा प्रवेश आणि परीक्षा शुल्क गोळा करण्यासाठी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील शाळांनी युपीआयचा वापर करण्याचं आवाहन शिक्षण मंत्रालयानं शाळांना केलं आहे. राज्य, केंद्रशासित प्रदेश तसंच एनसीइआरटी, सीबीएससी, केंद्रीय विद्यालय संघटना, राष्ट्रीय विद्यालय संघटनांसारख्या स्वायत्त संस्थांना पत्राद्वारे हे आवाहन करण्यात आलं आहे. शाळांमधील कायदेविषयक, धोरणात्मक आणि संस्थात्मक सुधारणांच्या माध्यमातून जीवन आणि शिक्षण सुलभतेला प्रोत्साहन देण्याच्या व्यापक प्रयत्नांचा हा भाग आहे.

**<u>उत्तरप्रदेशमारहाणयोगी</u>**

उत्तर प्रदेशत बरेली इथं चोरीच्या खोट्या अफवेवरून जमावाने मारहाण करून हरिओम बाल्मिकी या व्यक्तीला ठार केलं; त्यांच्या कुटुंबियांची मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काल लखनौ इथं भेट घेतली. या कुटुंबाला न्याय, सुरक्षा देण्याचे तसंच गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याचं आश्वासन योगी यांनी दिलं आहे. बाल्मिकी यांच्या कुटुंबाला आवास योजनेअंतर्गत घर, बाल्मिकी यांच्या जागेवर पत्नीला नोकरी तसंच कुटुंबासाठी कल्याणकारी योजनांचा लाभ दिला जाईल असंही योगी म्हणाले.

**<u>पाकअफगाणसीमा</u>**

पाकिस्तानी लष्करी चौक्यांवर तालिबानने हल्ला केल्यानंतर काल रात्री पाकिस्तान- अफगाणिस्तान सीमेवर मोठी चकमक सुरू आहे. काबूलमध्ये पाकिस्तानने केलेल्या हवाई हल्ल्यांनंतर तालिबानने पाकिस्तान सैन्याविरूद्ध सशस्त्र संघर्ष सुरू केल्याचं तालिबानच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितलं. दक्षिण हेलमंड प्रांतातील पाकिस्तानच्या दोन चौक्या ताब्यात घेतल्याचा दावा करण्यात आला असून, स्थानिक अधिकाऱ्यांनी त्याला दुजोरा दिला आहे. पाकिस्तान जोरदार प्रत्युत्तर देत असल्याचं या अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**<u>मुंबईकस्टम</u>**

मुंबई विमानतळावर काल सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी एका भारतीयाला ६१ जिवंत प्राण्यांच्या तस्करी प्रकरणी अटक केली. या प्राण्यांमध्ये सरीसृप, दुर्मिळ सस्तन प्राणी आणि किटकांचा समावेश आहे. हा प्रवासी बँकॉकहून मुंबईला आला होता.

**<u>माओवादी</u>**

छत्तीसगडच्या दंतेवाडा जिल्ह्यात सुरक्षा दलांनी शुक्रवारी सहा माओवाद्यांना अटक केली आणि मंगनार रस्त्याजवळ लावलेली स्फोटकं निकामी करण्यात यश मिळवले. संशयास्पद व्यक्तींबाबत मिळालेल्या

माहितीनंतर बारसूर पोलिस स्टेशन, जिल्हा राखीव रक्षक, केंद्रीय राखीव पोलिस दल यांच्या संयुक्त पथकानं ही कारवाई केली.

**बॅडमिंटन**

बीडब्ल्यूएफ जागतिक कनिष्ठ अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत, अंतिम फेरीत चीनने गतविजेत्या इंडोनेशियाचा २-० असा पराभव केला. तर भारतानेही स्पर्धेत कास्यपदक मिळवले. या स्पर्धेत ३० हून अधिक देशांनी सहभाग घेतला होता आणि भारत त्याचा आयोजक होता.

**दिल्लीअर्धमॅरेथॉन**

केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी काही वेळापूर्वी दिल्ली हाफ मॅराथॉनला हिरवा झेंडा दाखवत प्रारंभ केला आहे. आशियातल्या या प्रमुख स्पर्धेत 40 हजार 500 पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय आणि भारतीयस्पर्धक सहभागी होत आहे. यंदाच्या अर्ध मॅरेथॉनमध्ये तिन्ही संरक्षण दल सहभागी होत आहेत.

**क्रिकेटमालिका**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात दिल्लीमध्ये सुरू असलेल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारत भक्कम स्थितीत असून भारतानं 378 धावांची आघाडी घेतली आहे. यशस्वी जयसवाल आणि कर्णधार शुभमन गिल यांच्या शतकांच्या जोरावर भारतानं 5 बाद 518 धावांवर आपला पहिला डाव घोषित केला. जयसवालनं 175 धावा केल्या तर शुभमन गिलनं नाबाद 129 धावा केल्या. या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाहुण्या संघाची सुरुवात मात्र अडखळत झाली. कालचा खेळ संपला तेव्हा वेस्टइंडीजच्या 4 बाद 140 धावा झाल्या होत्या.

**आयसीसीमहिला**

**आयसीसी** महिला विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात लढत होणार आहे. विशाखापट्टणम इथं दुपारी 3 वाजता हा सामना सुरु होईल.

स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात इंग्लड ने श्रीलंकेचा 89 धावांनी पराभव करत आपला सलग तिसरा विजय नोंदवला. कोलंबो मध्ये झालेल्या या सामन्यात इंग्लंडनं दिलेल्या 254 धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेचा संघ 164 धावांवर गारद झाला.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.